**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५मधील कलम १९(३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ६२२/२०२३**

**अपिलार्थी, श्री. पांडूरंग रामरावजी गायकी**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग**
जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर

**अंतरिम आदेश दिनांक : १३.११.२०२५**
**अंतीम आदेश दिनांक : ०७.०९.२०२६**

**निर्णय**

अपिलार्थी श्री. पांडूरंग रामरावजी गायकी यांनी दिनांक ०६.०३.२०२३ रोजी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपीलावर आयोगाने दिनांक १३.११.२०२५ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहे.

“विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसाच्या अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने तत्काळ विनामुल्य पुरवावे. व त्याची पोहच आयोगास सादर करावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे”.

“तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी”.

उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर श्री. निरंजन गभणे यांची त्यांचा स्वयंस्पष्ट लेखी आयोगास सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी अपील क्रमांक ६२२/२०२३, यात अपिलाथी श्री. पांडूरंग रामरावजी गायकी यांनी दिनांक ०६.०३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाकडे केलेले द्वितीय अपील अर्जावर दिनांक

१३.११.२०२५ रोजी सुनावणी घेवून पारित अंतरिम आदेशाचे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९.०२.२०२६ रोजी पालन केले असल्याबाबत आयोगाची खात्री पटली आहे. त्याचप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविण्यास झालेला विलंबाबाबत लेखी खुलासा मागविण्यात आला होता. त्यांचा खुलासा आयोगाला प्राप्त झाला असून तो मान्य करीत, झालेला विलंब क्षमापित करण्यात येत असून, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तुतचे व्दितीय अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र *नागपूर*

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०७.०९.२०२६**

जावक क्रमांक 8892 दिनांक 21 SEP 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर